## ४) धोरण :

### अ) प्रमुख धोरणे

- पंचायत राज संस्थांचे प्रशिक्षण पूर्ण करणे व त्यांची कार्यक्षमता वाढविणे व त्यायोगे आरोग्य व्यवस्थापन अधिक कार्यक्षम करणे.
- प्रत्येक गावासाठी प्राथमिक आरोग्य सेवांचे स्थानिक गरजानुसार, लोकप्रतिनिधीच्या सहभागासह नियोजन करणे.
- सध्या अस्तित्वात असलेल्या ग्रामीण रूग्णालयांचे व प्राथमिक आरोग्य केंद्रांचे बळकटीकरण करणे.
- स्थानिक नियोजनातून आरोग्य उपकेंद्राचे सक्षमीकरण. यासाठी उपकेंद्रासाठी स्वतंत्र निधीची उपलब्धता.
- जिल्हास्तरावर सर्वंकष व सर्वसमावेशक कृतियोजना तयार करणे व अंमलबजावणी करणे.

- कुटुंब कल्याण व इतर आरोग्य कार्यक्रमाचे सर्व स्तरावर एकत्रीकरण (राष्ट्रीय, राज्य, जिल्हास्तर व तालुक्यास्तर)
- सर्व स्तरांवर तांत्रिक मार्गदर्शन व सक्षमीकरण करणे.
- आरोग्यमाहिती व आकडेवारी व्यवस्थापनाचे बळकटीकरण (MIS)
- आरोग्यदायी जीवनशैली विकसीत करण्यासाठी नियोजन. तंबाखू व इतर घातक पदार्थांचे सेवन कमी करण्यासाठी नियोजन.
- स्वयंसेवी संस्थाचे बळकटीकरण - (विशेषत: ग्रामीण भागात)

## ब) दुय्यम धोरणे

- खाजगी वैद्यकिय क्षेत्रावर योग्य नियंत्रण ठेवणे.
- राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रम अंमलबजावणीत खाजगी वैद्यकीय क्षेत्राचा सहभाग वाढविणे.
- ग्रामीण क्षेत्रातील आरोग्य सेवा ध्यानात घेवून वैद्यकीय शिक्षणाची पुर्नरचना
- समाजाला पुरेसे आरोग्य विमा संरक्षण उपलब्ध करून देणे.